# जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड


स्टेशन रोड, नांदेड – ४३१६०१

E-mail : mahnandc@mhstate.nic.in
Telephone No. : 02462 - 234555, **244683** Fax No. : 02462-244682


## निविदा सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, नांदेड जिल्हा न्यायालयास मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून न्यायालयीन कामकाजाकरिता जिल्हा न्यायालय तसेच तालुका न्यायालयांसाठी Kyocera २०४०DN प्रिंटरचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत सदरील प्रिंटरपैकी बरेच प्रिंटर नादुरुस्त झालेले असून, त्यांची आवश्यक दुरुस्ती तसेच पुढील ०1 (एक) वर्षाकरिता दुरुस्ती सेवा अटी व शर्तीनुसार स्थानिक बाजारातील इच्छुक व पात्र पुरवठादार/सेवा प्रदात्यांकडून करून घेणे प्रस्तावित आहे. त्यासाठी इच्छुक पुरवठादारांकडून सीलबंद निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी, इच्छूक पुरवठादारांनी दिनांक ५ ऑगस्ट २०२६ किंवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांचे नांवे सीलबंद निविदा या कार्यालयास सादर कराव्यात. तसेच सीलबंद निविदा लिफाफ्यावर " Kyocera 2040 DN प्रिंटर दुरूस्ती निवीदा " असा उल्लेख करावा.

**निविदेतील अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

1. निविदा/दरपत्रक सीलबंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक राहील.
2. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख 5 ऑगस्ट 2026 राहील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या निविदांचा विचार करण्यात येणार नाही.
3. निविदाकाराने प्रिंटरची दुरुस्ती, आवश्यक सुटे भाग, मनुष्यबळ व सेवा शुल्क यांचा समावेश असलेले दर स्पष्टपणे नमूद करावेत.
4. दुरुस्ती करण्यात आलेल्या प्रिंटरसाठी पुरवठादाराने आवश्यक त्या कालावधीची सेवा हमी/वॉरंटी देणे बंधनकारक राहील.
5. निविदा मंजूर झाल्यानंतर संबंधीत प्रिंटरची दुरुस्ती व देखभाल कार्य वेळेत पूर्ण करणे निविदाकारास बंधनकारक राहील.
6. दुरुस्तीकरिता आवश्यक असलेले सुटे भाग दर्जेदार व मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.
7. निविदा स्वीकारणे किंवा कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांचेकडे राखीव राहील.

8. निविदेतील दरांमध्ये सर्व लागू कर, वाहतूक खर्च, सेवा शुल्क व इतर अनुषंगिक खर्चाचा समावेश असावा.

9. निविदाकाराने प्रिंटरची दुरुस्ती व पुढील 1 वर्षाच्या कालावधीतील दुरुस्ती सेवा समाधानकारकपणे उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

10. निविदा मंजूर झालेल्या पुरवठादारास कार्यालयाकडून देण्यात येणाऱ्या कार्यादेशानुसार सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

11. निविदा प्रक्रियेसंदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांचा राहील.

12. निविदा प्रक्रियेसंदर्भात आवश्यक ते बदल, दुरुस्ती किंवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांचेकडे राखीव राहील.

"आदेशावरून"

जिल्हा न्यायालय, नांदेड }
दिनांक: २७ जुलै, २०२६ }

प्रबंधक, 27.07.2026
जिल्हा न्यायालय, नांदेड

जा. क्र. / संगणक/ 5664 /२०२६
दि. २७ जुलै २०२६

प्रति,

* अधिक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांना सदरहू निवीदा सूचना अग्रेषीत करण्यात येवून कळविण्यात येते की, त्याची एक प्रत बेलीफामार्फत तात्काळ खालील ठिकाणी देवून / डकविण्यात यावी व मुळ गोषवारा या न्यायालयास परत करण्यात यावा.

१) जिल्हा न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
२) दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
३) मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
४) जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड

प्रबंधक, 27.07.2026
जिल्हा न्यायालय, नांदेड